दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


**लष्करी छावणीबाहेर स्फोट**

**नवी दिल्ली:** पंजाबमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या दोन स्फोटांमुळे सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या. जालंधरमधील सीमा सुरक्षा दलाच्या मुख्यालयाबाहेर स्फोट झाला आणि काही तासांनंतर, अमृतसरच्या खासा भागातील लष्करी छावणीजवळ स्फोट झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, दिलासादायक बाब म्हणजे या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या दोन्ही स्फोटांमध्ये काही संबंध आहे की या वेगवेगळ्या घटना आहेत, याचा तपास केला जात आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. ०७ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २२१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### आयोगाचे पोर्टल हॅक करण्याचे प्रयत्न

**नवी दिल्ली :** पाच राज्यांच्या विधानसभेसाठी मतमोजणी सुरू असताना, निवडणूक आयोगाचे पोर्टल हॅक करण्याचे ६८ लाखांहून अधिक प्रयत्न करण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली. विधानसभा निवडणुकांमध्ये रिअल-टाइम मॉनिटरिंग, जलद अहवाल सक्षम करणे आणि पारदर्शकता वाढविण्यासह निवडणूक प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यात ईसीआयएनईटीने मध्यवर्ती भूमिका बजावली आहे.

### शपथविधीला मोदी-शहा यांची उपस्थिती

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील भारतीय जनता पक्षाचे पहिले सरकार ९ मे रोजी ब्रिगेड परेड ग्राउंडवर शपथविधी घेणार आहे. विरोधी पक्षनेते सुवेंदु अधिकारी हे आघाडीवर आहेत, तर भाजपचे प्रदेशाध्यक्ष समिक भट्टाचार्य, केंद्रीय मंत्री सुकांत मजुमदार आणि माजी राज्यसभा खासदार स्वपन दासगुप्ता यांचीही नावे चर्चेत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजप अध्यक्ष नितीन नबीन, केंद्रीय मंत्री आणि भाजप आणि एनडीएशासित राज्यांचे मुख्यमंत्री शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

### तूर, हरभरा खरेदीची मुदत वाढवली

**मुंबई :** केंद्र सरकारने खरीप हंगामासाठी महाराष्ट्रातील तूर आणि हरबरा खरेदीचा कालावधी वाढविला आहे आणि हरभऱ्याच्या खरेदीचे लक्ष्य वाढवून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे, अशी माहिती राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. राज्य सरकारच्या विनंतीनंतर तूर खरेदीची मुदत ३१ मे पर्यंत आणि हरभऱ्यासाठी २९ मे पर्यंत वाढविण्यात आली आहे.

---

**केंद्र सरकारचा ऐतिहासिक निर्णय**

# ‘वंदे मातरम’ला राष्ट्रगीताइतकाच दर्जा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने ‘वंदे मातरम’ला राष्ट्रगीत ‘जन गण मन’प्रमाणेच समान दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. यासाठी ‘प्रिव्हेन्शन ऑफ इन्सल्ट्स टू नॅशनल ऑनर ॲक्ट, १९७१’मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयानंतर बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेल्या ‘वंदे मातरम’वर आता राष्ट्रगीताप्रमाणेच नियम आणि कायदेशीर संरक्षण लागू होणार आहे. म्हणजेच, ‘वंदे मातरम’च्या गायनात अडथळा आणणे, अपमान करणे किंवा जाणीवपूर्वक अनादर दाखवणे हा दंडनीय गुन्हा मानला जाईल. सध्या राष्ट्रीय ध्वज, संविधान आणि राष्ट्रगीताच्या अपमानासाठी तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही शिक्षेची तरतूद आहे. आता त्यात ‘वंदे मातरम’चाही समावेश केला जाणार आहे.

सरकार ‘वंदे मातरम’च्या १५०व्या वर्षानिमित्त हा बदल करत असल्याचे सांगितले जात आहे. कायद्यातील कलम ३ मध्ये सुधारणा करून ही तरतूद लागू केली जाणार आहे. त्यानुसार, एखाद्या व्यक्तीने जाणीवपूर्वक ‘वंदे मातरम’च्या गायनात अडथळा आणल्यास किंवा अपमान केल्यास तीन वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. पुन्हा गुन्हा केल्यास किमान एक वर्षाच्या शिक्षेची तरतूदही असणार आहे.

केंद्र सरकारने ‘वंदे मातरम’च्या सादरीकरणासाठी अधिकृत मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार, सहा कडव्यांची अधिकृत आवृत्ती प्रमुख शासकीय समारंभांमध्ये सादर केली जाईल. राष्ट्रध्वज फडकावणे, राष्ट्रपती आणि राज्यपालांच्या औपचारिक कार्यक्रमांतील आगमन-प्रस्थान समारंभ तसेच शासकीय कार्यक्रमांमध्ये त्याचा समावेश असेल. सरकारच्या नव्या प्रोटोकॉलनुसार, एखाद्या कार्यक्रमात ‘वंदे मातरम’ आणि ‘जन गण मन’ दोन्ही सादर होणार असतील, तर प्रथम ‘वंदे मातरम’ आणि त्यानंतर राष्ट्रगीत गायले जाईल. दोन्ही सादरीकरणादरम्यान उपस्थितांनी आदरार्थ उभे राहणे अपेक्षित असेल.

गृह मंत्रालयाने शाळा, महाविद्यालये आणि महत्त्वाच्या संस्थांमध्ये कार्यक्रमांमध्ये ‘वंदे मातरम’च्या गायनाला प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय प्रतीकांबद्दल आदर आणि जागरूकता वाढवणे हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, चित्रपटगृहे आणि चित्रपट प्रदर्शनांसाठी सरकारने काही सूट दिली आहे. चित्रपटाच्या पार्श्वसंगीताचा भाग म्हणून ‘वंदे मातरम’ वाजवले गेल्यास प्रेक्षकांना उभे राहणे बंधनकारक राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मनोरंजन स्थळांमध्ये सक्तीमुळे गोंधळ निर्माण होऊ शकतो, असे सरकारचे म्हणणे आहे.

---

## राजीनामा दिला नाही तर ममता बॅनर्जींना अटक?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात अभूतपूर्व घडामोडी घडताना दिसत आहेत. विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्यास नकार दिल्याने राज्यात मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे घटनात्मक प्रक्रियेबाबत विविध चर्चा सुरू झाल्या आहेत.

बहुमत गमावल्याचे चित्र स्पष्ट होत असतानाही ममता बॅनर्जी यांनी “मी राजीनामा देणार नाही,” अशी ठाम भूमिका घेतली आहे. त्यांनी नैतिकदृष्ट्या आपण पराभूत झालेल्या नाहीत, असा दावा केला आहे. तृणमूल काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. त्यामुळे संसदीय परंपरा आणि लोकशाही पद्धतीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

“राजीनामा न दिल्यास मुख्यमंत्री म्हणून त्यांना अटक होऊ शकते का?” असा प्रश्न राजकीय वर्तुळात चर्चिला जात आहे. मात्र, कायद्याच्या दृष्टीने केवळ राजीनामा न देणे हा कोणताही फौजदारी गुन्हा ठरत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत थेट अटक करण्याचा कोणताही कायदेशीर आधार नसल्याचे घटनातज्ज्ञांचे मत आहे. राज्यघटनेतील अनुच्छेद १६४(१) नुसार मुख्यमंत्रीपदावर राहण्यासाठी विधानसभेचा विश्वास आवश्यक असतो. मुख्यमंत्री बहुमत सिद्ध करण्यात अपयशी ठरले, तर राज्यपालांना त्यांना पदावरून हटवण्याचा अधिकार असतो. अशा परिस्थितीत राज्यपाल मंत्रिमंडळ बरखास्त करून नवीन सरकार स्थापनेसाठी प्रक्रिया सुरू करू शकतात. म्हणजेच, ममता बॅनर्जी यांना अटक होण्याची शक्यता नाही, असे मानले जात आहे.

---

## सुनेत्रा पवारांचा राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** राज्याच्या उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी आपल्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेत त्यांनी राजीनामा पत्र सुपूर्द केले.

उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांच्या राज्यसभा सदस्यत्वाबाबत चर्चा सुरू होती. मात्र, बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्यानंतर त्यांनी अधिकृतपणे खासदारकीचा राजीनामा दिला. नियमानुसार एखादी व्यक्ती दोन सभागृहांसाठी निवडून आल्यास १४ दिवसांच्या आत एका सभागृहाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देणे बंधनकारक असते.

दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे आली होती. आता त्यांच्या राजीनाम्यानंतर राज्यसभेतील रिक्त जागेसाठी लवकरच पोटनिवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी गेल्याच महिन्यात राज्यसभा सदस्य म्हणून शपथ घेतली आहे.

---

**युद्धबंदी आणि अणुकरारासाठी हालचालींना वेग**

# अमेरिका-इराण युद्ध समाप्तीच्या उंबरठ्यावर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**वॉशिंग्टन :** अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढता तणाव आता युद्धबंदीच्या दिशेने सरकत असल्याचे संकेत मिळत आहेत. अमेरिकन वृत्तसंस्थेने अमेरिकन अधिकारी आणि संबंधित सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही देश युद्ध समाप्ती आणि व्यापक अणुचर्चेसाठी एका पानाच्या सामंजस्य कराराच्या (एमओयू) अंतिम टप्प्यात पोहोचले आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, प्रस्तावित करारात १४ महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे. या कराराचा प्रमुख उद्देश तात्काळ युद्धबंदी लागू करणे आणि पुढील ३० दिवसांत अंतिम कराराला स्वरूप देणे हा आहे. या प्रक्रियेत इराण काही काळासाठी युरेनियम संवर्धन कार्यक्रम स्थगित करण्यास तयार झाल्याचे सांगितले जात आहे. त्याबदल्यात अमेरिका इराणवरील आर्थिक निर्बंध टप्प्याटप्प्याने हटवण्यास आणि गोठवलेली अब्जावधी डॉलर्सची मालमत्ता मुक्त करण्यास तयार असल्याची माहिती आहे.

दोन्ही देश होर्मुज सामुद्रधुनीतील तणाव कमी करण्यासाठी आणि सागरी व्यापार सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करण्यासही सहमत झाल्याचे समोर आले आहे. जागतिक तेल वाहतुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या या मार्गावर गेल्या काही महिन्यांत तणाव वाढला होता. या चर्चेच्या प्रक्रियेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुज परिसरातील लष्करी हालचाली कमी करण्याचा घेतलेला निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. अमेरिकन दूत स्टीव्ह विटकॉफ आणि जेरेड कुशनर हे थेट तसेच मध्यस्थांच्या माध्यमातून तेहरानशी संपर्कात असल्याचे वृत्त आहे. हा करार अंतिम झाला तर त्याची अधिकृत घोषणा ‘युद्ध समाप्ती’ म्हणून केली जाऊ शकते. पुढील तांत्रिक चर्चा इस्लामाबाद किंवा जिनिव्हा येथे होण्याची शक्यता आहे.

या चर्चेतील सर्वात मोठा वादाचा मुद्दा म्हणजे इराणच्या युरेनियम संवर्धनावर घालण्यात येणाऱ्या स्थगितीचा कालावधी. अमेरिका २० वर्षांची मर्यादा इच्छित आहे, तर इराणने ५ वर्षांचा प्रस्ताव दिला आहे. मात्र, दोन्ही बाजूंमध्ये १२ ते १५ वर्षांच्या कालावधीवर तडजोड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अमेरिकेची आणखी एक अट म्हणजे इराणने कराराचे उल्लंघन केल्यास ही स्थगिती आपोआप वाढवली जाईल. तसेच कराराच्या अंतिम शिक्कामोर्तब झाल्यानंतर इराणला ३.६७ टक्क्यांपर्यंत मर्यादित संवर्धन पुन्हा सुरू करण्याची मुभा मिळू शकते. मात्र, त्यासाठी अण्वस्त्रे तयार न करण्याची स्पष्ट हमी द्यावी लागणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेसाठी पुढील ४८ तास अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. अमेरिका सध्या तेहरानकडून अंतिम प्रतिसादाची प्रतीक्षा करत आहे.

---

**गोकुळ दूध संघ निवडणुकीत नवा ट्विस्ट**

# ९० दिवसांत निवडणूक घेण्याचे सर्वोच्च आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोल्हापूर :** राज्याचे लक्ष लागलेल्या गोकुळ दूध संघ निवडणूक प्रकरणात मोठी घडामोड घडली असून सर्वोच्च न्यायालयाने ९० दिवसांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. गोकुळवर प्रशासक नेमल्यानंतर अवघ्या दोन दिवसांतच या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने सुमारे १२०० संस्थांच्या तक्रारींची चौकशी पूर्ण झाल्यानंतरच निवडणूक घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर सत्ताधारी गटातील काही संचालकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

सहकारी कायद्यानुसार एखादी संस्था निवडणूक घेण्यास तयार नसल्यास तिच्यावर प्रशासक नेमण्याची तरतूद आहे. मात्र, गोकुळचे संचालक निवडणुकीसाठी तयार असतानाही सर्किट बेंचने दिलेल्या निर्णयाला आव्हान देण्यात आले होते. त्यावर सुनावणी करत सर्वोच्च न्यायालयाने आता निवडणूक प्रक्रिया ९० दिवसांत पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

तक्रार असलेल्या १२०० संस्थांपैकी सुमारे ७५० संस्थांची चौकशी पूर्ण झाली असून उर्वरित संस्थांची चौकशी पुढील चार ते पाच दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच निवडणुकीसाठी लागणारा ४५ दिवसांचा कालावधी लक्षात घेऊन संपूर्ण प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

दरम्यान, गोकुळच्या कारभारावरून राज्याचे मंत्री हसन मुश्रीफ आणि भाजप आमदार शिवाजी पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. दोघेही महायुतीतील नेते असले तरी या मुद्द्यावरून राजकीय संघर्ष तीव्र होताना दिसत आहे.

जिल्ह्यातील दूध उत्पादकांना न्याय देण्यासाठी १६ मार्च १९६३ रोजी गोकुळ दूध संघाची स्थापना झाली होती. गेल्या ६३ वर्षांत संघ जिल्ह्याच्या अर्थकारणाचा केंद्रबिंदू बनला.

जिल्हा मध्यवर्ती बँकेवर यापूर्वी दोनदा प्रशासक नेमले गेले होते; मात्र गोकुळवर प्रथमच प्रशासकाची नियुक्ती झाली आहे. यापूर्वी केडीसीसी बँक, बिद्री आणि भोगावती साखर कारखान्यांवर प्रशासकीय मंडळ आले होते. मात्र, दूध संघाचे स्वरूप वेगळे असल्याने गोकुळच्या कामकाजात प्रशासकांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागू शकते, अशी चर्चा सहकार क्षेत्रात सुरू आहे.

---

### ताज हॉटेलला बॉम्बहल्ल्याची धमकी

**मुंबई :** मुंबईतील ताज महाल पॅलेस आणि ट्रायडेंट हॉटेल येथे दहशतवादी हल्ल्याची धमकी देणारा फोन आल्याने एकच खळबळ उडाली. अज्ञात व्यक्तीने फोन करून दोन्ही हॉटेलमध्ये हल्ला होणार असल्याचा इशारा दिल्यानंतर मुंबई पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. प्राथमिक तपासात हा कॉल बनावट असल्याचे समोर आले आहे. अज्ञात कॉलरने दोन्ही हॉटेलमध्ये फोन करून दहशतवादी हल्ल्याची धमकी दिली होती. मुंबई पोलिसांनी तातडीने दोन्ही हॉटेल परिसरात तपासणी मोहीम राबवली. हॉटेल परिसराची पाहणी करण्यात आली तसेच सुरक्षा यंत्रणा सतर्क करण्यात आली.

---

## शेतकऱ्यांना थेट विक्रीची मोठी संधी

**राज्यातील प्रत्येक टोल नाक्यावर ‘कृषी मॉल’**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून आता प्रत्येक टोल नाक्यावर ‘कृषी मॉल’ उभारण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या पुढाकारातून हा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे शेतकऱ्यांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे नवे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

या कृषी मॉलच्या माध्यमातून शेतकरी ताजी भाजीपाला, फळे आणि इतर शेतमाल थेट विक्रीसाठी ठेवू शकणार आहेत. सध्या शेतकऱ्यांना आपला माल विकण्यासाठी दूरच्या बाजारपेठांमध्ये जावे लागते. त्यामुळे वाहतूक खर्च, वेळ आणि श्रम यांचा मोठा बोजा सहन करावा लागतो. मात्र, टोल नाक्यांवर हा विक्री केंद्र उपलब्ध झाल्याने हा अतिरिक्त खर्च आणि त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

या उपक्रमाचा फायदा ग्राहकांनाही होणार आहे. महामार्गावर प्रवास करणाऱ्या नागरिकांना टोल नाक्यांवर थांबताना ताजा शेतमाल सहज उपलब्ध होणार आहे. बाजारपेठेपेक्षा तुलनेने कमी दरात आणि अधिक ताज्या स्वरूपात माल मिळणार असल्याने ग्राहकांचा प्रतिसाद वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शेतकऱ्यांना त्यांच्या शेताजवळच विक्रीची सुविधा मिळाल्यामुळे वेळेची बचत होणार आहे. मध्यस्थांची भूमिका कमी होऊन थेट विक्रीला चालना मिळणार असल्याने हा निर्णय शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. यापूर्वी राज्य सरकारने आठवडी बाजारांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट विक्रीची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला होता.

---

**भारताच्या लष्करी धोरणात निर्णायक बदल घडवणारी मोहीम**

# पाकचे कंबरडे मोडणाऱ्या ‘ऑपरेशन सिंदूर’ची वर्षपूर्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर भारताने केलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’ला एक वर्ष पूर्ण झाले आहे. गेल्या अर्धशतकातील भारताची सर्वात व्यापक मल्टी-डोमेन लढाऊ मोहीम म्हणून ओळखल्या गेलेल्या या कारवाईने देशाच्या संरक्षण धोरणात मोठा बदल घडवून आणला. ड्रोनचा मोठ्या प्रमाणावर वापर, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने लक्ष्य विश्लेषण आणि नेटवर्क-केंद्रित युद्धपद्धती यामुळे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनाला नवे स्वरूप मिळाले.

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर ७ मे रोजी भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’ सुरू करत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. या कारवाईत किमान १०० दहशतवाद्यांचा खात्मा झाल्याचा दावा करण्यात आला. या हल्ल्यांमध्ये बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मद चे मुख्यालय, मुरीदकेतील लष्कर-ए-तोयबा चा तळ, तसेच सियालकोट, मुझफ्फराबाद, कोटली आणि भिंबर परिसरातील अनेक दहशतवादी तळ लक्ष्य करण्यात आले होते. या कारवाईनंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणाव झपाट्याने वाढला. पाकिस्तानने प्रत्युत्तरात्मक हल्ल्यांचे प्रयत्न केले, मात्र भारतीय सैन्याने त्यातील बहुतांश हल्ले परतवून लावले. अखेर १० मे रोजी दोन्ही देशांच्या लष्करी अधिकाऱ्यांमध्ये हॉटलाइनवर चर्चा झाल्यानंतर संघर्षविरामावर सहमती झाली.

‘ऑपरेशन सिंदूर’नंतर भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने युद्धतयारी वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बदल सुरू केले. विशेषत: ड्रोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, हवाई संरक्षण प्रणाली आणि आधुनिक क्षेपणास्त्रांच्या खरेदीवर भर देण्यात आला. गेल्या वर्षभरात केंद्र सरकारने अनेक महत्त्वाच्या संरक्षण खरेदींना मंजुरी दिली. यात रशियाकडून पाच नवीन एस-४०० ट्रायम्फ क्षेपणास्त्र प्रणाली खरेदी करण्याचा निर्णय, तसेच ६० मध्यम वाहतूक विमानांच्या खरेदीचा समावेश आहे. मार्च महिन्यात सरकारने २.३८ लाख कोटी रुपयांच्या लष्करी खरेदी प्रस्तावांना हिरवा कंदील दाखवला. भारतीय हवाई दलाची ताकद वाढवण्यासाठी केंद्र सरकारने फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. त्याचबरोबर भारतीय नौदलासाठी अमेरिकन बनावटीची सहा बोईंग पी-८ पोसाइडन टेहळणी विमाने खरेदी करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. भारत सहा स्टेल्थ पाणबुड्यांसाठी सुमारे ५ अब्ज युरोंचा करार करण्याच्या तयारीत असून जर्मनीची थायसेनक्रुप मरीन सिस्टिम्स आणि माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड या पाणबुड्या तयार करणार आहेत.

---

## सरकारी कर्मचाऱ्यांच्या हिंदी परीक्षेला स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्य शासनाच्या राजपत्रित आणि अराजपत्रित अधिकारी -कर्मचाऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या हिंदी भाषेच्या परीक्षेला अखेर स्थगिती देण्यात आली आहे. मराठी विरुद्ध हिंदी असा वाद निर्माण झाल्यानंतर मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी ही घोषणा केली.

राज्य शासनाच्या भाषा संचालनालयाने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषेची परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला होता. ही परीक्षा २८ जून रोजी मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात येणार होती. मात्र, या निर्णयाला महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि विविध मराठी संघटनांनी विरोध दर्शवला होता. मराठी भाषा अभ्यास केंद्राचे डॉ. दीपक पवार यांनीही या निर्णयावर आक्षेप घेतला होता. त्यानंतर शासनाने या परीक्षेला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला.

याबाबत बोलताना उदय सामंत म्हणाले, “सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठीची हिंदी भाषेची परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या विषयावर विभागाच्या प्रधान सचिवांशी चर्चा करण्यात आली असून परीक्षेला स्थगिती देण्यात आली आहे. भविष्यात ही परीक्षा आवश्यक आहे का, याचा पुनर्विचार केला जाईल. आवश्यकता नसल्यास हिंदीची परीक्षा न घेण्याचा निर्णय घेतला जाईल.” ते म्हणाले की, “१९८६ च्या नियमावलीनुसार दरवर्षी ही परीक्षा घेतली जाते.

## संपादकीय

# 'लाल' ताऱ्याचा अस्त आणि धोरणात्मक पोकळी



**५० वर्षांत पहिल्यांदाच भारताच्या नकाशावर एकाही राज्यात कम्युनिस्टांचे सरकार नसणे, ही केवळ राजकीय घटना नाही. हा एका कालबाह्य झालेल्या विचारधारेचा आणि बदलाला नाकारणाऱ्या मानसिकतेचा अटळ असा शेवट आहे.**

भारतीय राजकारणाच्या पटलावर गेल्या पाच दशकांपासून आपली एक वेगळी 'स्पेस' राखून असलेल्या डाव्या विचारधारेचा आज जो संकोच झाला आहे, तो अनाकलनीय नक्कीच नाही. निकाल जाहीर झाल्यानंतर विदारक वास्तव समोर येते, भारतात आता एकाही राज्यात कम्युनिस्टांचे सरकार उरलेले नाही. ५० वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासांनंतर आलेला हा टप्पा म्हणजे भारतीय साम्यवादाच्या 'अस्त'मानाची नांदी आहे. जग ज्या वेगाने अठराव्या शतकातील पोथ्या टाकून एकविसाव्या शतकातील 'डेटा' आणि 'एआय'च्या जगात शिरले, त्या वेगाशी जुळवून घेण्यात डाव्यांनी दाखवलेली असमर्थता आज त्यांच्या मुळावर आली आहे. ही एका पक्षाची हार नाही, तर 'बदलाला' कायमचा विरोध करणाऱ्या एका जडत्ववादी मानसिकतेचा हा पराभव आहे. पश्चिम बंगालमध्ये ३४ वर्षांची सत्ता गमावल्यानंतरही डाव्यांनी कोणताही धडा घेतला नाही, हे आज स्पष्ट झाले आहे. केरळ हा त्यांचा शेवटचा बालेकिल्ला होता, पण तिथली सत्ताही आता त्यांच्या हातातून निसटली आहे. डाव्यांच्या या ऱ्हासामागे सर्वात मोठे कारण म्हणजे त्यांची 'भाबडी' आणि 'कालबाह्य' झालेली आर्थिक धोरणे. आजही ते कामगार वर्गाच्या हिताच्या गप्पा मारतात, पण हा कामगार आता कारखान्यातून बाहेर पडून 'गिग इकॉनॉमी'मध्ये स्थिरावला आहे, हे त्यांना उमजलेले नाही. झोमॅटो किंवा स्विगीच्या डिलिव्हरी बॉयला 'क्रांती' नको आहे, तर त्याला चांगल्या पायाभूत सुविधा आणि सन्मानाने जगण्याची संधी हवी आहे. डावे मात्र आजही रशियन क्रांतीच्या आणि मार्क्सच्या ग्रंथांच्या मखरात बसून जगाकडे पाहत आहेत. हे म्हणजे वाफेच्या इंजिनावर चालणाऱ्या रेल्वेने 'हायपरलूप'शी स्पर्धा करण्यासारखे आहे. डाव्यांची दुसरी मोठी चूक म्हणजे त्यांनी मध्यमवर्गीयांच्या आकांक्षांकडे केलेले दुर्लक्ष. १९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतर भारतात जो एक मोठा मध्यमवर्ग उभा राहिला, त्याला डाव्यांनी कायमच 'भांडवलदारांचे दलाल' म्हणून हिणवले. ज्या मध्यमवर्गाला प्रगती, जागतिक बाजारपेठ आणि खासगी गुंतवणुकीची ओढ लागली होती, त्या वर्गाशी डाव्यांचा संवादच तुटला. आजचा मतदार हा अधिक व्यावहारिक झाला आहे. त्याला घोषणा नको आहेत, तर त्याला निकाल हवे आहेत. भाजप किंवा इतर प्रादेशिक पक्षांनी मतदारांच्या या 'आकांक्षा' पकडल्या, तिथे डावे मात्र 'तत्वांच्या' नावाखाली साचलेपणात अडकून पडले. जागतिक स्तरावर पाहिल्यास, चीनने साम्यवाद आणि भांडवलशाही यांचा जो एक अजब 'कॉकटेल' तयार केला, तो भारतीय डाव्यांना कधीच पचला नाही. ज्या काळात भारत माहिती तंत्रज्ञानाचे केंद्र बनत होता, त्या काळात डावे संगणकाला विरोध करत रस्त्यावर उतरले होते. ही 'तंत्रज्ञानविरोधी' प्रतिमा त्यांच्या कपाळावर कायमची चिकटली. आधुनिक जगाशी वैर पत्करून कोणतीही विचारधारा टिकू शकत नाही, हे साम्यवाद्यांनी विसरले. डाव्यांच्या या ऱ्हासाचा फटका भारतीय लोकशाहीलाही बसला आहे. एक काळ असा होता की, डावे पक्ष हे संसदेत सरकारवर वचक ठेवणारे आणि जनसामान्यांचे प्रश्न ताकदीने मांडणारे विरोधी पक्ष म्हणून ओळखले जात होते. आज तो 'बौद्धिक वचक' संपला आहे. विरोधकांची जागा आता केवळ आरडाओरडा करणाऱ्यांनी घेतली आहे, तिथे डाव्यांची विश्लेषणात्मक मांडणी हरवली आहे. येथे एक कळीचा मुद्दा असा की, भारतात आता 'डावं राजकारण' उरलेले नाही का? याचे उत्तर 'नाही' असे आहे. कल्याणकारी योजना, गरिबांचे हक्क आणि सामाजिक न्यायाचा मुद्दा आजही तितकाच जिवंत आहे. पण, हे मुद्दे मांडण्याची पद्धत बदलली आहे. आम आदमी पक्ष किंवा काही प्रादेशिक पक्षांनी डाव्यांच्या या 'कल्याणकारी' राजकारणाला नव्या ढंगात मांडले आणि ते यशस्वी झाले. भारताच्या राजकीय नकाशावरून लाल रंग पुसला जाणे, हा एक मोठा धोरणात्मक धडा आहे. कोणत्याही विचारधारेला जिवंत राहायचे असेल, तर तिला काळानुसार स्वतःमध्ये बदल करावे लागतात. जो स्वतःला बदलत नाही, त्याला इतिहास बदलतो. ५० वर्षांच्या प्रदीर्घ सत्तेनंतर डावे आज ज्या वळणावर उभे आहेत, तिथे त्यांना 'आत्मचिंतन' करण्याशिवाय पर्याय नाही. पण दुर्दैव असे की, ज्या विचारधारेत 'आत्मटीका' हा परवलीचा शब्द होता, तिथेच आता केवळ अहंकाराचे इमले उरले आहेत. राजकारण हा शेवटी 'आकांक्षेचा' व्यापार आहे. ज्याच्याकडे लोकांच्या स्वप्नांना वाव देणारी धोरणे आहेत, तोच राज्य करू शकतो. लाल ताऱ्याचा हा अस्त म्हणजे भारतीय लोकशाहीतील एका मोठ्या पर्वाचा शेवट आहे. हा लाल बावटा आता इतिहासाच्या पुस्तकातच फडकत राहील, हे मात्र निश्चित.

# ममतांची खुर्चीची जिद्द आणि घटनात्मक पेच!

**» पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्यास नकार दिल्याने निर्माण झालेला घटनात्मक पेचप्रसंग आणि त्यातून उभे राहिलेले लोकशाहीतील नैतिकतेचे प्रश्न, हे एका राज्यापुरते मर्यादित राहिलेले नाहीत.**



भारतीय राजकारणात 'राजीनामा' हा शब्द अलीकडच्या काळात केवळ शब्दकोशापुरता किंवा जुन्या काळच्या आठवणींपुरता मर्यादित राहिला आहे की काय, असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती सध्या पश्चिम बंगालमध्ये निर्माण झाली आहे. आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालयातील त्या भीषण घटनेनंतर उठलेले जनक्षोभाचे वादळ आणि विरोधकांनी लावून धरलेली मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी, या पार्श्वभूमीवर ममता बॅनर्जी यांनी 'राजीनामा देणार नाही' असा घेतलेला पवित्रा ही केवळ राजकीय जिद्द नाही; तो एक अस्सल 'संविधानात्मक पेच' आहे. लोकशाहीत 'नैतिकता' आणि 'संख्याबळ' यांच्यातील संघर्ष जेव्हा टोकाला जातो, तेव्हा सत्तेच्या खुर्चीला संविधानाचा आधार कसा दिला जातो, याचा हा एक ज्वलंत वस्तुपाठ ठरावा.

संविधानाच्या कलम १६३ आणि १६४ चा आधार घेतला, तर मुख्यमंत्री हे राज्यपालांच्या 'मर्जी'वर पद भूषवतात. पण ही मर्जी म्हणजे काही राज्यपालांचा स्वेच्छाधिकार किंवा खासगी मालमत्ता नाही. जोपर्यंत मुख्यमंत्र्यांकडे विधानसभेचे निर्विवाद बहुमत आहे, तोपर्यंत त्यांना पदावरून हटवण्याचे धाडस राजभवनातील 'महामहीम'ही करू शकत नाहीत.

ममता बॅनर्जी यांच्याकडे तृणमूल काँग्रेसचे प्रचंड बहुमत आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या त्या खुर्चीवर बसून राहू शकतात. पण प्रश्न जेव्हा प्रशासकीय अपयशाचा आणि यंत्रणेच्या चिंधड्या उडण्याचा येतो, तेव्हा केवळ 'मॅजिक फिगर'ची ढाल पुढे करणे लोकशाहीच्या तत्त्वांना धरून आहे का? "बहुमत हे अनेकदा सत्तेचे कवच बनते, पण ते नैतिक अध:पतनापासून वाचवू शकत नाही", हे भान विसरणे सत्ताधाऱ्यांच्या अंगलट येते.

बंगालमधील सध्याची परिस्थिती पाहता राज्यपालांकडे कलम ३५६ चा वापर करण्याची शिफारस करण्याचा पर्याय असतो. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने 'एस. आर. बोम्मई' खटल्यात दिलेल्या निकालानंतर, केंद्र सरकारला निवडून आलेले सरकार बरखास्त करणे म्हणजे 'आगीशी खेळ' वाटू लागला आहे. कायदा-सुव्यवस्था बिघडली म्हणजे 'घटनात्मक यंत्रणा कोलमडली' असा अर्थ काढणे हे सध्याच्या कायदेशीर चौकटीत अत्यंत कसरतीचे काम आहे. ममता बॅनर्जी यांना यातील फटी नेमक्या ठाऊक आहेत. म्हणूनच त्यांनी राजीनाम्याची मागणी फेटाळून लावताना 'जनतेने मला निवडून दिले आहे' हाच जुना राग आळवला आहे. पण लक्षात ठेवले पाहिजे की, जनतेने निवडून देणे म्हणजे स्वैराचाराचा 'कोरा धनादेश' मिळणे नव्हे.

या संपूर्ण खेळात न्यायालयीन हस्तक्षेपालाही एक मर्यादा आहे. जोपर्यंत एखादा नेता कायदेशीररित्या अपात्र ठरत नाही, तोपर्यंत न्यायालय त्याला राजीनामा देण्यास भाग पाडू शकत नाही. ममता बॅनर्जी यांच्या विरोधात कोणतीही थेट फौजदारी कारवाई सध्या तरी नाही. अशा वेळी केवळ 'नैतिक जबाबदारी' म्हणून राजीनामा देण्याची अपेक्षा करणे, हे सध्याच्या कोरड्या आणि सत्तांध राजकारणात एक 'भाबडी आशा'च ठरते. बंगालमध्ये आज जे घडत आहे, ते सत्ता आणि संवेदनशीलता यांच्यातील रुंदावलेली दरी अधोरेखित करणारे आहे. जेव्हा रक्षकच व्यवस्थेतील त्रुटींचे समर्थन करू लागतात, तेव्हा लोकशाहीतील 'चेक्स अँड बॅलन्सेस' केवळ कागदावर उरतात.

ममता बॅनर्जी यांची खुर्ची कदाचित टिकून राहीलही, पण त्या खुर्चीची जी एक 'नैतिक जरब' असायला हवी, ती मात्र या प्रकरणाने कायमची पुसली गेली आहे. राजभवनातून येणारे पत्रप्रपंच आणि केंद्राकडून होणारी विचारणा याला 'राजकीय सूडबुद्धी' म्हणून मोकळे होणे सोपे आहे, पण स्वतःच्या प्रशासनातील सडकेपणा मान्य करणे हे खऱ्या नेतृत्वाचे लक्षण असते.

संविधानातील तरतुदींचा आधार घेऊन पद वाचवता येते, पण जनमानसातील विश्वास संपादन करण्यासाठी चारित्र्य आणि पारदर्शकता लागते. बंगालचा हा पेचप्रसंग भारतीय राजकारणातील अशा एका धोकादायक वळणाची नांदी आहे, जिथे 'बहुमत' हे उत्तरदायित्वापेक्षा श्रेष्ठ मानले जाऊ लागले आहे. नवान्न आणि राजभवन यांच्यातील हे द्वंद्व केवळ बंगालचे राजकारण प्रदूषित करत नसून, देशातील संघराज्य रचनेच्या मर्यादाही उघड्या पाडत आहे. ममता बॅनर्जी यांचा निर्णय त्यांच्या राजकीय अस्तित्वासाठी कदाचित 'समतोल' असेल, पण लोकशाहीच्या मूल्यांसाठी तो नक्कीच 'विघातक' आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पालिकेचा 'पदपथ मुक्त पंधरवडा'

## अतिक्रमणविरोधी धडक मोहीम सुरू; १५ मे पर्यंत कारवाई सुरूच राहणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत शहरातील फूटपाथ व रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी १ ते १५ मे दरम्यान 'पदपथ मुक्त पंधरवडा' मोहीम राबविण्यात येत आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई सुरू असून, उप आयुक्त अतुल पाटील आणि संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात विविध प्रभागांत धडक कारवाई केली जात आहे.

फ प्रभागात २ व ३ मे रोजी आरटीए रोड, त्रिवेणी नगर चौक ते तळवडे चौक तसेच देहू-आळंदी रोड परिसरात अतिक्रमण हटविण्यात आले. या कारवाईत टपऱ्या, हातगाड्या, प्लास्टिक कॅरेट, लोखंडी रॅक, स्टँड बोर्ड, खुर्च्या, टेबल आदी साहित्य जप्त करण्यात आले. भाजीपाला व फळ विक्रेत्यांकडील टमाटर, भेंडी, बटाटा, काकडी, मिरची यांसारखा शेकडो किलो भाजीपाला जप्त करून इस्कॉन फूड रिलिफ फाउंडेशनच्या अन्नछत्रात जमा करण्यात आला.

प्रभाग क्रमांक १, चिखली येथे सत्संग रोड ते पिंगळे चौकपर्यंतचा रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यात आला. सर्व हातगाड्या व टपऱ्यांवर कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले.

इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी अंतर्गत ३ व ४ मे रोजी आळंदी रोड व नाट्यगृह परिसरात कारवाई करण्यात आली. यात हातगाड्या, इलेक्ट्रिक काटे, स्टँडी बोर्ड, टेबल, छत्र्या तसेच कपडे व चप्पलांचे गाठोडे जप्त करण्यात आले. या मोहिमेसाठी एमएसएफ जवान, पोलीस व महापालिका कर्मचाऱ्यांचा समन्वय ठेवण्यात आला. ड प्रभागातील रहाटणी परिसरात ४ मे रोजी जगताप डेअरी ते पिके चौक, कुणाल आयकॉन रोड व गोविंद गार्डन परिसरात मोहीम राबविण्यात आली. येथे कूलर, पाणीपुरी ठेले, हातगाड्या व प्लास्टिक कॅरेट यांसह विविध साहित्य जप्त करण्यात आले. तसेच फळ विक्रेत्यांकडील आंबे, केळी व नारळ मोठ्या प्रमाणात जप्त करून अन्नछत्रात जमा करण्यात आले. याशिवाय पिंपळे सौदागर परिसरातही कारवाई सुरू असून ह झोनमध्ये पदपथ अतिक्रमणमुक्त मोहिमेला वेग देण्यात आला आहे.

महापालिकेने जप्त केलेले सर्व साहित्य संबंधित गोडाऊनमध्ये जमा करण्यात आले आहे. सार्वजनिक रस्ते व फूटपाथ मोकळे ठेवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या सातत्यपूर्ण कारवाईमुळे वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास आणि पादचाऱ्यांना सुरक्षित व मोकळा मार्ग उपलब्ध होण्यास मदत होत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या अतिक्रमणविरोधी मोहिमेत अतिक्रमण निरीक्षक, बीट निरीक्षक, प्रशासन अधिकारी, विविध प्रभागांतील कर्मचारी सक्रियपणे सहभागी झाले होते. तसेच एमएसएफ जवान, पोलीस कर्मचारी, कंत्राटी मजूर, ड्रायव्हर आणि कॅमेरामन यांच्या समन्वयातून ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे.

# बाजार समिती संचालकांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वडगाव मावळ :** मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या १३ संचालकांनी राजीनामे दिल्यानंतर जिल्हा उपनिबंधकांनी संचालक मंडळ बरखास्तीचा आदेश पणनमंत्री जयकुमार रावल यांनी पुढील आदेश होईपर्यंत स्थगित केला आहे.

सदर बाजार समितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे १२, काँग्रेसचा १ आणि भाजपचे ५ असे संख्याबळ होते. मात्र सभापती पदाच्या निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादीतील ६ संचालक फुटल्याने भाजपचे सुभाषराव जाधव हे सभापतीपदी निवडून आले. या घडामोडीमुळे राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला होता. या पार्श्वभूमीवर आमदार सुनील शेळके, जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शिंदे आणि तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी संचालकांना राजीनामे देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार १३ संचालकांनी सहाय्यक निबंधक नवनाथ अनपट यांच्याकडे राजीनामे सादर केले. हे राजीनामे जिल्हा उपनिबंधकांकडे पाठवण्यात आले होते. त्यानंतर जिल्हा उपनिबंधकांनी संचालक मंडळ बरखास्त करण्याचा आदेश देत बाजार समितीवर प्रशासक म्हणून सहाय्यक निबंधक अनपट यांची नियुक्ती केली. या निर्णयामुळे राष्ट्रवादी आणि भाजप या दोन्ही पक्षांच्या संचालकांना पद गमवावे लागले. या आदेशाविरोधात सभापती सुभाषराव जाधव यांच्यासह भाजपचे संचालक शिवाजी असवले, बंडू घोजगे, साईनाथ मांडेकर आणि नामदेव कोंडे यांनी मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे अपील दाखल केले होते.

# मधुकर दामोदर जोशी यांचा मानपत्र देऊन सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** महापालिकेच्या वतीने पत्रकारिता, कला, साहित्य आदी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणारे मधुकर दामोदर जोशी यांचा सर्वसाधारण सभेत मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, तसेच इतर नगरसदस्य व अधिकारी उपस्थित होते.

सन्मान स्वीकारताना मधुकर जोशी म्हणाले की, "महानगरपालिकेने दिलेला सन्मान आनंददायी असला तरी शहराच्या सर्वांगीण प्रगतीचे समाधान अधिक मोठे आहे. अनेक ठिकाणी कार्यातील समन्वय व एकसंधता अभावाने दिसते; मात्र पिंपरी-चिंचवडमध्ये ती प्रकर्षाने जाणवते. सुरक्षित निवास, सुलभ प्रवास आणि नागरिकांमधील आपुलकी या बाबींमध्ये होत असलेली प्रगती आशादायक आहे. ४८ वर्षांनंतर पुन्हा महानगरपालिकेच्या सभागृहात येण्याचा योग हा अभिमानास्पद क्षण आहे. येथील सकारात्मक वातावरण आणि कार्यसंस्कृतीमुळे शहराच्या विकासाला गती मिळत आहे." असे ते म्हणाले.

मधुकर जोशी यांनी यापूर्वी नगरपालिका काळात नगरसदस्य म्हणूनही काम केले असून, त्यांच्या कार्यामुळे शहराच्या नावलौकिकात भर पडली आहे. मानपत्राचे वाचन विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी केले.

# पिंपरीत हॉटेलसमोर तरुणावर जीवघेणा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** साई चौक परिसरातील एका हॉटेलसमोर किरकोळ कारणावरून तिघांनी मिळून एका तरुणावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पिंपरी पोलिसांनी तिघा आरोपींना अटक केली असून त्यांच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्नासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ४ मे रोजी पहाटे सुमारे २ वाजण्याच्या सुमारास साई चौक येथील 'रोनक' हॉटेलसमोर घडली. फिर्यादी अशिष जगन्नाथ वालुंज (वय ३०, रा. पिंपरी) हे आपल्या मित्रासह हॉटेलमध्ये जेवण्यासाठी गेले होते. यावेळी हॉटेल बंद असल्याचे वेटरने सांगितल्याने वाद निर्माण झाला. हा वाद चिघळत जाऊन पुढे मारहाणीत परिवर्तित झाला.

या वेळी आरोपी अब्बास असादुद्दीन शेख, मोहम्मद अजीज अशान शेख आणि पंकज उर्फ बंटी शंकर भुमकर यांनी फिर्यादीला जबरदस्तीने हॉटेलबाहेर ओढून नेले. त्यानंतर धारदार शस्त्र आणि इतर वस्तूंनी त्याच्यावर बेदम मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात फिर्यादी गंभीर जखमी झाला आहे.

हल्ल्यादरम्यान आरोपींनी हातातील शस्त्र हवेत फिरवत परिसरात दहशत निर्माण केली. त्यामुळे रस्त्यावरून जाणारे नागरिक घाबरून पळून गेले आणि काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम १०९, ३५२, ११५(२), ३(५) तसेच क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे.

### जमिनीच्या वादातून शेतकऱ्याला मारहाण

**पुणे :** जिल्ह्यातील खेड तालुक्यातील माळवाडी (मौजे गडद) येथे जमिनीच्या वादातून एका ६५ वर्षीय शेतकऱ्यावर मारहाण झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणपत कोंडू शिंदे (वय ६५, व्यवसाय शेती, रा. माळवाडी, ता. खेड, जि. पुणे) हे त्यांच्या घराच्या मागील जागेत असताना आरोपी क्रमांक १ सखाराम कोंडू शिंदे हा जेसीबी मशीनच्या सहाय्याने जमिनीचे लेव्हलिंग करत होता. याबाबत विचारणा केल्यावर आरोपी संतापला. सखाराम शिंदे याने शिवीगाळ करत फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्याचवेळी त्याचा मुलगा मंगेश शिंदे याने दगडाने मारून जखमी केले, तर दुसरा मुलगा अमीर शिंदे याने काठीने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी जात असताना जेसीबी चालक विलास देशमुख यानेही त्यांना धमकावत मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही घटना ३ मे रोजी सायंकाळी सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास घडली असून ४ मे रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भरधाव ट्रकची दुचाकीला धडक

**पुणे :** निगडी परिसरात भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याची घटना घडली असून या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महेश बाबर (वय ३८, रा. तळवडे, पुणे) हे ४ मे रोजी रात्री सुमारे २:१० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या ॲक्टिव्हा (क्र. एमएच १० डीडब्ल्यू ३९६७) वरून प्रवास करत होते. त्रिवेणी नगर चौक, हनुमान मंदिरासमोर, चिंचवड-पुणे मार्गावरून जात असताना मागून येणाऱ्या ट्रकने (क्र. एमएच ०४ एलक्यू ९७१५) वेगात व निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात महेश बाबर यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत झाली असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला.

# एक्सप्रेसवेवर भीषण अपघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर मावळ तालुक्यातील ओझर्डे गावाजवळ सोमवारी पहाटे झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रेलर (क्रमांक जीजे-२७ टीएफ-९६०७) चालक प्रविण धनाजी सिंग (वय २८, रा. राजस्थान) हा एक्सप्रेसवेवरून प्रवास करत असताना मागून येणाऱ्या कार (क्रमांक एमएच-१२ झेडई-५१०२) चालकाने वेगाने आणि निष्काळजीपणे वाहन चालवत ट्रेलरला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की कारचे मोठे नुकसान झाले.

या अपघातात सुनीता नारायण भट (वय ५५, रा. मुंबई) यांचा जागीच मृत्यू झाला. तर सौदागर देविदास गायकवाड (वय ४२), बिपीन प्रजापती (वय २७, रा. पुणे) आणि एम. डी. नईम अकबर (वय ५३, रा. बिहार) हे गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी कार चालक प्रतीक सरवदे (वय २१, रा. भोसरी, पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. प्राथमिक तपासानुसार, वेगमर्यादेचे उल्लंघन आणि निष्काळजी वाहनचालना हे अपघाताचे मुख्य कारण असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### सायबर फसवणुकीचे दोन प्रकार उघड

**पुणे** : शहरातील हडपसर परिसरात सायबर गुन्हेगारांनी नव्या पद्धतीने नागरिकांना जाळ्यात ओढत मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. डेटिंग ॲपवरून ओळख वाढवून ऑनलाईन व्यवसायाचे आमिष दाखवणे तसेच शेअर व्यवहारातून भरघोस नफा मिळवून देण्याचे आश्वासन देत दोन वेगवेगळ्या प्रकरणांत तब्बल २० लाखांहून अधिक रक्कम उकळण्यात आली आहे. पहिल्या प्रकरणात प्रितम प्रमोद जोशी (वय ३०, रा. हडपसर) यांच्याशी 'बिलॉंग' या डेटिंग ॲपवरून 'अनाया शर्मा' नावाच्या महिलेने संपर्क साधला. संवादातून विश्वास संपादन करत तिने ऑनलाईन वस्तू विक्री (ड्रॉप शिपिंग) व्यवसायाची माहिती दिली आणि एका संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन दुकान सुरू करण्यास प्रवृत्त केले. सुरुवातीला कमी गुंतवणुकीत नफा दाखवून विश्वास बसवण्यात आला. त्यानंतर विविध कारणे सांगत वेगवेगळ्या खात्यांवर पैसे जमा करण्यास भाग पाडत अखेर १५ लाख ३१ हजार रुपये उकळण्यात आले. पैसे काढण्याचा प्रयत्न करताच खाते बंद करून आरोपींनी संपर्क तोडला. दुसऱ्या प्रकरणात शेखरीपुरम अनंथक्रिशनन रंगनाथन (वय ६८, रा. हडपसर) यांना व्हॉट्सॲप गटाद्वारे शेअर बाजारात मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले. विविध लिंक आणि ॲपच्या माध्यमातून गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करत आरोपींनी त्यांच्याकडून टप्प्याटप्प्याने ४ लाख ७९ हजार रुपये उकळले. नंतर पैसे परत मिळवण्यासाठी आणखी मोठी रक्कम भरण्याची अट घालण्यात आली. मात्र पैसे परत न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनांमुळे नागरिकांनी अनोळखी व्यक्तींशी ऑनलाईन व्यवहार करताना अत्यंत सतर्क राहण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. संशयास्पद लिंक, ॲप किंवा गुंतवणुकीच्या आमिषांना बळी न पडता तत्काळ सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## श्री गिरीजात्मजचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक

# अंगारकनिमित्त लेण्याद्री येथे गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर** : अंगारक संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने मंगळवार, दि. ५ मे २०२६ रोजी ता. जुन्नर येथील श्री क्षेत्र लेण्याद्री येथे 'श्री गिरीजात्मज' गणपतीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली. दिवसभर मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने मंदिर व गणेशमूर्तीची फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती.

देवस्थानच्या वतीने 'श्री गणेश महायाग'चे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ५.३० वाजता देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे आणि विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापूजा पार पडली. त्यानंतर भाविकांसाठी दर्शन खुले करण्यात आले.

अंगारक संकष्टी चतुर्थी निमित्त सकाळी ६, दुपारी १२ आणि सायंकाळी ६ वाजता महाआरती करण्यात आली. दिवसभर विविध धार्मिक विधी पार पडले. देवस्थानच्या वतीने भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या तसेच गर्दीचे नियोजनही प्रभावीपणे करण्यात आले.

'श्री गणेश महायाग'साठी एकूण ४६ यजमानांनी सहभाग नोंदवला. सकाळी ९ वाजता दीपप्रज्वलन आणि गणेशपूजनाने महायागाची सुरुवात झाली. त्यानंतर विधीवत पूजन, होमहवन आणि महाआरती करण्यात आली. सहभागी यजमानांचा देवस्थानतर्फे श्रींची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

नैवेद्यासाठी गोळेगाव येथील विकास सिताराम ताम्हाणे व ब्राम्हणवाडा येथील सुधीर रामदास गायकर यांनी प्रत्येकी २ कॅरेट केळी, तर जुन्नर येथील भगत व डोके परिवार यांनी १ कॅरेट आंबे अर्पण केले.

सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांच्या वतीने संगीत भजनाचे आयोजन करण्यात आले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी महाआरती पार पडली. त्यानंतर नारायणगाव येथील छाया सखाराम पारधी व सखाराम कोंडीभाऊ पारधी तसेच अकोले येथील अजिंक्य मांजुलकर यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला देवस्थानचे उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, काशिनाथ लोखंडे, नंदकुमार बिडवई, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने यांच्यासह कर्मचारी, भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंगारक संकष्टी चतुर्थीनिमित्त पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक तसेच परिसरातील पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी आले होते, अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड. संजय ढेकणे आणि सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.

## श्री महागणपती चरणी हजारो भाविक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती** : अष्टविनायकांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र रांजणगाव येथील श्री महागणपती मंदिरात अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त भाविकांची मोठी गर्दी झाली. मात्र जतन व दुरुस्तीच्या कामांमुळे मंदिर १५ एप्रिल ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत भाविकांसाठी बंद ठेवण्यात आले आहे.

अष्टविनायक विकास आराखड्याअंतर्गत महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या निधीतून पुरातत्त्व विभागामार्फत मंदिरांच्या जतन व संवर्धनाची कामे सुरू आहेत. त्यानुसार श्री महागणपती मंदिरातही दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी नित्य पूजाअर्चा व धार्मिक विधी नियमानुसार सुरूच आहेत.

अंगारकी संकष्टी चतुर्थीनिमित्त पहाटे ५ वाजता श्रींचा अभिषेक करण्यात आला. मंदिर बंद असल्यामुळे भाविकांसाठी एलईडी स्क्रीनवर श्रींचे थेट दर्शन उपलब्ध करून देण्यात आले.

महाद्वार परिसरात मोठा मंडप उभारून भाविकांची सोय करण्यात आली होती. तसेच प्रसाद म्हणून केळी व पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था देवस्थान ट्रस्टतर्फे करण्यात आली.

दुपारी १२ वाजता मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव यांच्या हस्ते महापूजा व महानैवेद्य अर्पण करण्यात आला. मंदिर बंद असतानाही भाविकांनी आणि ग्रामस्थांनी सहकार्य केल्याबद्दल देवस्थान ट्रस्टने आभार मानले असून पुढील काळातही एलईडी स्क्रीनद्वारे दर्शन घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी अध्यक्षा स्वाती पाचुंदकर, उपाध्यक्ष संदिप दौंडकर, सचिव डॉ. तुषार पाचुंदकर, व्यवस्थापक बाळासाहेब गोऱ्हे, पांडुरंग चोरगे, संतोष रणपिसे, रमाकांत शेळके तसेच देवस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## ओतूर पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा** : ओतूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतून विविध ठिकाणांहून गहाळ झालेल्या सुमारे ३ लाख ५० हजार रुपये किमतीच्या १० मोबाईलचा शोध घेण्यात ओतूर पोलिसांना यश आले आहे. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे विविध जिल्ह्यांमधून हे मोबाईल हस्तगत करण्यात आले.

मोबाईल हरवल्याच्या तक्रारी प्राप्त होताच पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. तांत्रिक तपास पद्धतींचा वापर करून पोलिस पथकाने विविध ठिकाणी शोधमोहीम राबवत एकूण १० मोबाईल जप्त केले. यापैकी ७ मोबाईल जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या हस्ते मूळ मालकांना परत करण्यात आले असून उर्वरित मोबाईल सुपूर्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

काही महिन्यांपूर्वी हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने संबंधित मालकांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी ओतूर पोलिसांच्या कार्यतत्परतेचे आणि तांत्रिक कौशल्याचे कौतुक केले.

ही कारवाई पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल आणि अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांच्या सूचनेनुसार, जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील व ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक संदिप आमणे, पोलीस हवालदार नरेंद्र गोराणे, बाळशिराम भवारी, आशिष जगताप तसेच पोलीस मित्र छोटू मनियार यांनी सहभाग घेतला. ओतूर पोलिसांच्या या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## वडिलांकडूनच विवाहित मुलीचे अपहरण

### ४ तासांत ७ आरोपी जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मंचर** : कौटुंबिक वादातून धक्कादायक प्रकार समोर आला असून, विवाहित मुलीचे अपहरण स्वतः तिच्या वडिलांनीच केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पारगाव कारखाना पोलिसांनी अतिशय तत्पर कारवाई करत अवघ्या चार तासांत वडिलांसह एकूण सात आरोपींना अटक केली आहे. ही माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ मे रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास साक्षी विशाल भागवत (रा. पारगाव, लबडेमळा, ता. आंबेगाव, जि. पुणे) ही विवाहिता तिच्या सासरच्या नातेवाईकांसोबत असताना, तिचे वडील आणि इतर सहा जणांनी एकत्र येत तिच्यावर मारहाण, शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर तिला जबरदस्तीने एस-क्रॉस व स्विफ्ट या वाहनांमध्ये बसवून पळवून नेण्यात आले. या अपहरणामागील उद्देश पीडितेला जबरदस्तीने दुसरे लग्न लावून देण्याचा असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ सक्रिय झाले. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ठिकाणी शोधमोहीम राबवण्यात आली आणि अवघ्या चार तासांत सर्व आरोपींना वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शिवाजी भाऊ खाटेकर (वय ४५, रा. पारगाव), अमोल चांगदेव रोडे (वय ३३), सचिन रावसाहेब रोडे (वय २९), अक्षय विश्वनाथ वाडगे (वय २९), अभिजीत बारकू रोडे (वय २६), नंदकिशोर विलास तितर (वय ३२, सर्व रा. नांदूर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) तसेच जयश्री अशोक कुदनर (वय ३५, रा. साकोर, ता. संगमनेर) यांचा समावेश आहे.

या प्रकरणी पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लोकरे, अविनाश कालेकर, सचिन डामसे, संजय साळवे, मंगेश अभंग, चंद्रकांत गव्हाणे, प्रशांत जगताप तसेच महिला पोलीस काजल फलके यांचा सहभाग होता.

## महिनाभरात कर्जमाफीचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : राज्यातील शेतकरी कर्जमाफीसंदर्भातील प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून येत्या एका महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. कृषी आयुक्त कार्यालयात झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

राज्य शासनाने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर केली आहे. या योजनेनुसार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे दोन लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीक कर्ज माफ करण्याचा प्रस्ताव आहे. नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कर्जमाफीसाठी आवश्यक सर्व तांत्रिक माहिती संकलनाचे काम पूर्ण झाल्याचे सांगताना भरणे यांनी स्पष्ट केले की, शासन शेतकरी हितासाठी ठाम असून या निर्णयाचा व्यापक फायदा होणार आहे.

दरम्यान, अलीकडील अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीबाबतही प्रशासनाने कार्यवाही वेगाने सुरू केली आहे. बाधित क्षेत्रांचे पंचनामे पूर्ण झाले असून पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार लवकरच नुकसानभरपाई वितरित केली जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकार शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार आणि ग्रामीण युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी 'कृषी मित्र' योजना सुरू करणार आहे. या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात राज्यभरात ११ हजार ५८७ पर्यवेक्षकांची नियुक्ती केली जाणार असून निवड झालेल्यांना दरवर्षी १८ हजार रुपये मानधन दिले जाईल. हे मानधन तीन महिन्यांच्या अंतराने वितरित करण्यात येणार आहे. १ जूनपासून ही योजना राज्यभर राबवण्याचा शासनाचा मानस आहे. या उपक्रमामुळे आधुनिक शेती पद्धती गावागावात पोहोचतील आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास भरणे यांनी व्यक्त केला.

या योजनेसाठी अर्जदाराचे वय ४० वर्षांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. किमान माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण असावे, तसेच चांगले संवाद कौशल्य, समाजकार्याची आवड आणि माहिती तंत्रज्ञान साधनांचा वापर करण्याची क्षमता अपेक्षित आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने एकूण जागांपैकी ३० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

## मंचर बाजार समितीत कांद्याची वाढती आवक




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची आवक वाढल्यामुळे मंगळवारी बाजारभाव स्थिर राहिल्याचे दिसून आले. चांगल्या प्रतीच्या कांद्याला प्रति १० किलोमागे १४० रुपये असा कमाल दर मिळाल्याची माहिती सभापती निलेश थोरात यांनी दिली.

मंगळवारी बाजार समितीत तब्बल २३,५०० पिशव्यांची कांद्याची आवक झाली. वाढत्या आवकेनंतरही बाजारात दरात मोठी घसरण किंवा वाढ न होता संतुलित स्थिती राहिली. यामुळे शेतकऱ्यांना समाधानकारक दर मिळाल्याचे चित्र आहे.

दर्जानुसार कांद्याचे दर पाहता, सुपर लॉट (१ नंबर गोळा कांदा) याला १३० ते १४० रुपये, सुपर १ नंबर कांद्याला ११० ते १२० रुपये, सुपर मिडीयम (२ नंबर) कांद्याला ९० ते १२० रुपये, गोल्टी कांद्याला ४० ते ८० रुपये, तर बदला कांद्याला ४० ते १०० रुपये असा भाव मिळाला.

वाढती आवक आणि तुलनेने स्थिर मागणी यामुळे बाजारभाव नियंत्रित राहिले असून, पुढील काही दिवसांत आवक आणि मागणीच्या स्थितीनुसार दरात बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## नागापुरात डाळिंब चोरीचा मोठा फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील नागापूर येथे डाळिंब उत्पादक शेतकरी बाळू बबन लोखंडे यांना मोठा आर्थिक फटका बसल्याची घटना समोर आली आहे. त्यांच्या शेतातील सुमारे १२५ क्रेट डाळिंबाची फळे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे बुधवारी (दि. ६) सकाळी उघड झाले.

नागापूर गावाजवळील खंडोबा देवस्थान थापलिंग गडाच्या पश्चिमेकडील परिसरात लोखंडे यांची शेती आहे. त्यांनी यावर्षी प्रथमच दीड एकर क्षेत्रात डाळिंबाची लागवड करत सुमारे तीन लाख रुपयांची गुंतवणूक केली होती. बागेत सध्या मोठ्या प्रमाणात फळे लागलेली असून पुढील पंधरा दिवसांत तोडणी होणार होती. मात्र, त्याआधीच चोरट्यांनी बागेवर डल्ला मारत मोठ्या प्रमाणात फळांची चोरी केली.

चोरट्यांनी सुमारे १२५ क्रेट डाळिंबाची फळे लंपास केली असून सध्या बाजारात डाळिंबाला प्रतिकिलो २५० ते ३०० रुपये दर मिळत आहे. एका क्रेटमागे साधारणपणे पाच हजार रुपये उत्पन्न मिळत असल्याने या घटनेत लोखंडे यांचे अंदाजे सहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

बुधवारी सकाळी बागेत पाणी देण्यासाठी गेले असता फळे गायब झाल्याचे लक्षात येताच लोखंडे यांना मोठा धक्का बसला. त्यांनी तत्काळ स्थानिक सामाजिक कार्यकर्ते विजय चासकर यांना घटनेची माहिती दिली.

या प्रकरणी पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतीमालाच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पोलिसांनी तातडीने तपास करून चोरट्यांचा शोध घ्यावा तसेच सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## आठव्या वर्षी 'वर्ल्ड नंबर १' मानांकन

# अन्वी हिंगेची जागतिक बुद्धिबळात झेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक येथील अन्वी दीपक हिंगे हिने अत्यंत लहान वयात बुद्धिबळाच्या पटावर जागतिक स्तरावर भक्कम ठसा उमटवत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अवघ्या आठव्या वर्षीच तिने आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत फिडेच्या अंडर-९ मुलींच्या गटात जगातील अव्वल क्रमांक पटकावला आहे. विशेष म्हणजे, या वयोगटात 'वूमन कँडिडेट मास्टर' किताब मिळवणारी ती जगातील पहिली आणि एकमेव खेळाडू ठरली आहे. तिच्या या अभूतपूर्व यशामुळे देशासह महाराष्ट्राच्या क्रीडाक्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.

चिंचवड येथील एलप्रो इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या अन्वीने लहान वयातच सातत्यपूर्ण आणि दर्जेदार कामगिरी करत जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. राज्यस्तरावर अंडर-७ गटात विजेतेपद मिळवताना तिने अंडर-९ गटात उपविजेतेपद पटकावले. राष्ट्रीय स्तरावर कांस्यपदक जिंकत तिने देशपातळीवरही आपली ताकद सिद्ध केली आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरही अन्वीची घोडदौड तितकीच प्रभावी राहिली आहे. अंडर-८ गटात उपविश्वविजेती ठरत तिने राष्ट्रकुल स्पर्धेत रौप्यपदक मिळवले, तर पश्चिम आशिया युवा स्पर्धेत दोन सुवर्ण आणि चार रौप्य पदकांची कमाई करत भारताचा झेंडा उंचावला. तिच्या या उल्लेखनीय यशाची दखल घेत 'फेमिना' मासिकाने २०२६ च्या विशेष अंकात तिला १० वर्षांखालील भारतातील सर्वोत्तम यशस्वी मुलांमध्ये स्थान दिले आहे.

स्पेनमधील ॲलिकांते येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत महिला विजेतेपद पटकावत अन्वीने आपल्या कारकिर्दीत आणखी एक मानाचा टप्पा गाठला. या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीमुळे तिच्या इलो रेटिंगमध्ये मोठी वाढ होऊन ते १८२४ पर्यंत पोहोचले आहे. याच जोरावर ती सध्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर विराजमान झाली आहे.

आपल्या यशाबद्दल बोलताना अन्वी म्हणाली, "मला बुद्धिबळ खूप आवडते. प्रत्येक सामन्यातून काहीतरी नवीन शिकण्याचा मी प्रयत्न करते. जगात नंबर १ बनणे आणि डब्ल्यूसीएम किताब मिळवणे हा माझ्यासाठी खूप आनंदाचा क्षण आहे. पुढे भारतासाठी आणखी मोठे यश मिळवायचे आहे."

अत्यंत लहान वयात मोठी स्वप्ने पूर्ण करत अन्वी हिंगे आज नवोदित खेळाडूंसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. तिच्या या यशामुळे ग्रामीण भागातील प्रतिभेलाही जागतिक व्यासपीठ मिळू शकते, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे.

## दिगंबर शेळके यांची पीएसआयपदी निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती** : सोनेसांगवी येथील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील दिगंबर दिलीप शेळके यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात ५२ वा क्रमांक मिळवत पोलिस उपनिरीक्षक पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण असून ग्रामस्थांनी जल्लोषात मिरवणूक काढत त्यांचा सत्कार केला.

दिगंबर शेळके यांनी २०१७ साली महाराष्ट्र पोलिस दलात पोलिस कॉन्स्टेबल म्हणून सेवेला सुरुवात केली होती. मात्र त्यानंतर त्यांनी पीएसआय होण्याचे ध्येय ठेवून सातत्याने अभ्यास सुरू ठेवला. २०२३ मधील पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मैदानी चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण करत त्यांनी अखेर राज्यात ५२ वा क्रमांक पटकावला. एप्रिल मध्ये जाहीर झालेल्या निकालात त्यांची पीएसआयपदी नियुक्ती निश्चित झाली.

यावेळी रांजणगाव एमआयडीसी येथील पोलिस उपनिरीक्षक नीळकंठ तिडके यांच्या हस्ते दिगंबर शेळके यांना फेटा बांधून, शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. गावातील पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### विजेचा धक्का लागून हत्तीचा मृत्यू

**सेराईकेला:** झारखंडच्या सेराईकेला-खरसावन जिल्ह्यातील चांडिल उपविभागातील जंगलात बुधवारी एका हत्तीला विजेचा धक्का लागून त्याचा मृत्यू झाल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. सेराईकेलाचे विभागीय वन अधिकारी (डीएफओ), सबा आलम अन्सारी यांनी सांगितले की, ३० वर्षीय हत्ती मृतावस्थेत आढळला आणि त्याच्या सोंडेवर विजेच्या तारा गुंडाळलेल्या होत्या.

### सेक्सटॉर्शन रॅकेटच्या सूत्रधाराला अटक

**नवी दिल्ली** : एका बनावट व्हिडिओ कॉल आणि ब्लॅकमेलद्वारे एका २१ वर्षीय तरुणाची २.५२ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी, दिल्ली पोलिसांनी राजस्थानच्या मेवात भागातील सेक्सटॉर्शन रॅकेटच्या कथित सूत्रधाराला अटक केली आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने बुधवारी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीची ओळख अब्बास खान (२५) अशी असून तो राजस्थानमधील अलवर जिल्ह्याचा रहिवासी आहे. तो अनेक सेक्सटॉर्शन आणि फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये कथितरित्या सामील होता आणि सायबर गुन्हेगारी नेटवर्कमध्ये मुख्य सूत्रधार म्हणून काम करत होता. एका महिलेकडून फ्रेंड रिक्वेस्ट आल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचा आरोप दिल्लीतील एका रहिवाशाने केला होता.

### भटक्या कुत्र्यांनी मुलीला ठार मारले

**होशियारपूर** : पंजाबच्या होशियारपूर जिल्ह्यातील एका गावात मोकाट कुत्र्यांच्या कळपाने हल्ला करून एका आठ वर्षांच्या मुलीला ठार केले, अशी माहिती पोलिसांनी दिली. मृत व्यक्तीची ओळख सलोनी, मूळची उत्तर प्रदेशची रहिवासी असून सध्या खराल खुर्द गावात राहत होती. ही घटना सकाळी साडेआठच्या सुमारास घडली, जेव्हा मुलगी शाळेत जाण्यापूर्वी घरातून बाहेर पडली होती. वाटेत भटक्या कुत्र्यांच्या कळपाने तिला घेरले आणि तिच्यावर निर्घृणपणे हल्ला केला.

## मुख्यमंत्रीपदासाठी महिला चेहऱ्याची चर्चा

# बंगालमध्ये 9 मे रोजी शपथविधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने (भाजप) मिळवलेल्या निर्णायक विजयाच्या पार्श्वभूमीवर राज्यात नव्या सरकारच्या स्थापनेची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे. त्यानुसार, येत्या शनिवार, ९ मे रोजी शपथविधी सोहळा पार पडणार असून मुख्यमंत्रीपदासाठी कोणाची निवड होणार याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. अद्याप अधिकृत घोषणा झालेली नसली तरी, यावेळी भाजपकडून महिला नेत्याला मुख्यमंत्रीपदाची संधी दिली जाऊ शकते, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.



मुख्यमंत्रीपदासाठी प्रमुख दावेदार म्हणून सुवेंदू अधिकारी यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. त्यांनी ममता बॅनर्जी यांना सलग दोन वेळा पराभूत करत राज्यातील राजकारणात मोठा प्रभाव निर्माण केला आहे. त्यांच्या आक्रमक शैलीमुळे आणि संघटनात्मक ताकदीमुळे ते भाजपचे मजबूत चेहरे मानले जातात.

दरम्यान, भाजप महिला नेतृत्वाला प्राधान्य देण्याच्या विचारात असल्याचे संकेत मिळत असून काही महिला नेत्यांची नावे पुढे आली आहेत. त्यामध्ये अग्निमित्रा पॉल या प्रमुख दावेदार मानल्या जात आहेत. आसनसोल दक्षिण मतदारसंघातून त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या उमेदवाराचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला आहे. फॅशन डिझायनर म्हणून करिअर केल्यानंतर राजकारणात दाखल झालेल्या पॉल या सध्या भाजपच्या महिला आघाडीतील महत्त्वाच्या नेत्या आहेत.

याशिवाय रूपा गांगुली यांचेही नाव चर्चेत आहे. 'महाभारत' मालिकेत द्रौपदीची भूमिका साकारून प्रसिद्ध झालेल्या गांगुली यांनी राजकारणात सक्रिय भूमिका बजावत राज्यसभा सदस्य म्हणूनही काम केले आहे. अलीकडील निवडणुकीत त्यांनी विजय मिळवून आपली राजकीय पकड अधिक मजबूत केली आहे.

इतर संभाव्य दावेदारांमध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष शमिक भट्टाचार्य, माजी प्रदेशाध्यक्ष दिलीप घोष तसेच संघ परिवाराशी संबंधित काही वरिष्ठ नेत्यांची नावेही चर्चेत आहेत. त्यामुळे अंतिम निवड ही अनेक घटकांचा विचार करूनच केली जाणार असल्याचे स्पष्ट आहे.

मुख्यमंत्रीपदाच्या निवडीसाठी भाजपने केंद्रीय पातळीवर महत्त्वाची तयारी सुरू केली आहे. या प्रक्रियेसाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांची सह-निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. त्यांच्या उपस्थितीत भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक होऊन मुख्यमंत्रीपदाचा अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

भाजपच्या या विजयामुळे राज्यातील दीर्घकाळ चालत आलेल्या तृणमूल काँग्रेसच्या वर्चस्वाला मोठा धक्का बसला आहे. आगामी काळात नव्या सरकारकडून प्रशासनात कोणते बदल केले जातात, तसेच मुख्यमंत्रीपदी कोणाची निवड होते, यावर राज्याच्या राजकारणाची पुढील दिशा ठरणार आहे.

## राहुल गांधींचा पुन्हा 'मतचोरी'चा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राजकीय वातावरण तापले असून विरोधकांकडून गंभीर आरोपांची सरबत्ती सुरू झाली आहे. काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपवर "मतचोरी"चा आरोप करत निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी दावा केला की, लोकसभेतील भाजपच्या २४० खासदारांपैकी सुमारे प्रत्येक सहावा खासदार हा "मतचोरीमुळे" निवडून आला आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वरील पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी म्हटले की, "मतचोरी कधी एखादी जागा तर कधी संपूर्ण सरकारच हिसकावून घेते." भाजपच्या भाषेत अशा प्रतिनिधींना "घुसखोर" म्हणावे का, असा उपरोधिक सवालही त्यांनी उपस्थित केला. याशिवाय त्यांनी भारतीय निवडणूक आयोग यांच्या निष्पक्षतेवरही थेट शंका उपस्थित करत, निवडणूक प्रक्रिया "रिमोट कंट्रोलवर चालवली जाते" असा आरोप केला.

राहुल गांधी यांनी पुढे हरियाणातील भाजप सरकारवरही निशाणा साधत, "ते सरकारही अशाच पद्धतीने सत्तेत आले आहे," असा दावा केला. निष्पक्ष निवडणुका झाल्या असत्या, तर भाजपला १४० जागांच्याही आसपास यश मिळाले नसते, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये भाजपने २९४ पैकी २०७ जागा जिंकत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. या निकालानंतर ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसनेही निकालावर तीव्र आक्षेप घेतला आहे. ममता बॅनर्जी यांनी निवडणूक प्रक्रियेत "मोठ्या प्रमाणावर अनियमितता" झाल्याचा आरोप केला आहे.

## पंजाबमध्ये दोन स्फोटांनी खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : मंगळवारी रात्री पंजाब राज्यात सुरक्षा यंत्रणांच्या जवळच सलग दोन स्फोट झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. या घटनांमुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली असून, विरोधी पक्षांनी या प्रकाराचा निषेध करत राज्यात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला आहे.



पहिला स्फोट रात्री सुमारे ८ वाजता जालंधर येथे सीमा सुरक्षा दलाच्या पंजाब फ्रंटियर मुख्यालयाबाहेर झाला. त्यानंतर दुसरा स्फोट रात्री ११ वाजण्याच्या सुमारास अमृतसर येथील लष्करी छावणी परिसरात घडला. सुदैवाने, दोन्ही घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

अमृतसर ग्रामीणचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक सुहेल मीर कासिम यांनी दिलेल्या माहितीनुसार, खासा भागात मोठा आवाज झाल्याची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक तपासात सीमाभिंतीच्या दिशेने स्फोटक वस्तू फेकल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. स्फोटामुळे काही प्रमाणात भौतिक नुकसान झाले असून, घटनास्थळी फॉरेन्सिक आणि बॉम्ब निकामी पथकाने तपास सुरू केला आहे.

जालंधरमध्येही स्फोटानंतर पार्क केलेल्या स्कूटरला आग लागल्याचे समोर आले आहे. स्फोटामुळे वाहतूक सिग्नल, जवळील दुकानांच्या काचा आणि इतर मालमत्तेचे नुकसान झाले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्फोटानंतर एक व्यक्ती घटनास्थळावरून पळून जात असल्याचे दिसून आले आहे. या घटनांनंतर संपूर्ण परिसर सील करण्यात आला असून पोलीस आणि लष्करी दलांनी संयुक्तरित्या तपास सुरू केला आहे.

## पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीनंतर हिंसाचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीनंतर सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी कठोर भूमिका घेत संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कारवाईचे निर्देश दिले आहेत. हिंसाचार आणि तोडफोडीत सहभागी असलेल्या सर्वांना लगेच अटक करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

बुधवारी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील संदेशखाली परिसरात दोन गटांमध्ये झालेल्या संघर्षादरम्यान नजात पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी (ओ.सी.) भरत प्रसून पुरकायस्थ यांच्यासह पाच पोलीस कर्मचारी आणि एका जवानावर गोळीबार झाला. या घटनेत पोलीस अधिकारी गंभीर जखमी झाले असून इतर जखमींवरही उपचार सुरू आहेत. सर्व जखमींना कोलकाता येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

राज्यातील २९४ विधानसभा मतदारसंघांचे निकाल जाहीर झाल्यानंतरही हिंसाचाराच्या घटना थांबलेल्या नाहीत. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी ने २०७ जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. राज्यात २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान पार पडले होते. मुख्य निवडणूक आयुक्तांनी राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, कोलकाता पोलीस आयुक्त तसेच केंद्रीय सशस्त्र पोलीस दल यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना संवेदनशील भागांमध्ये सातत्याने गस्त ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. "हिंसाचार भडकवणाऱ्यांना आणि तोडफोड करणाऱ्यांना तात्काळ अटक झाली पाहिजे," असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, मंगळवारी राज्यातील विविध भागांत हिंसाचाराच्या घटनांमध्ये किमान दोन जणांचा मृत्यू झाला. हावडा जिल्ह्यातील उदयनारायणपूर येथे भाजप कार्यकर्ता जादब बार यांची मारहाण करून हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील न्यू टाऊन येथे मधू मंडल यांच्या हत्येचाही आरोप करण्यात आला आहे. दुसरीकडे बीरभूम जिल्ह्यातील नानूर येथे तृणमूल काँग्रेस समर्थक अबीर शेख यांची हत्या झाल्याची घटना समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आणि केंद्रीय दलांची मोठ्या प्रमाणावर तैनाती करण्यात आली आहे. संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## हल्द्वानी प्रकरणी आरोपींना आत्मसमर्पणाचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २०२४ मधील हल्द्वानी दंगल प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय देत उत्तराखंड उच्च न्यायालयाने दिलेला डिफॉल्ट जामीन रद्द केला आहे. तसेच दोन्ही आरोपींना दोन आठवड्यांच्या आत सत्र न्यायालयासमोर आत्मसमर्पण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने ४ मे रोजी उत्तराखंड सरकारने दाखल केलेल्या विशेष रजा याचिकेवर सुनावणी घेत हा आदेश दिला. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात उच्च न्यायालयाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, "उच्च न्यायालयाने तपास प्रक्रियेबाबत केलेली निरीक्षणे वस्तुस्थितीशी सुसंगत नाहीत. गुन्ह्याचे गांभीर्य आणि आरोपी-साक्षीदारांची मोठी संख्या लक्षात घेता तपास यंत्रणेसमोर आव्हाने असतानाही तपास जलदगतीने करण्यात आला आहे." हे प्रकरण ८ फेब्रुवारी २०२४ रोजी हल्द्वानीतील बनभूलपुरा भागात झालेल्या हिंसाचाराशी संबंधित आहे. या घटनेत हिंसक जमावाने गोळीबार, दगडफेक, पेट्रोल बॉम्बचा वापर, पोलिसांच्या वाहनांची जाळपोळ आणि पोलीस ठाण्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे. नैनिताल उच्च न्यायालयाने मुख्य आरोपी जावेद सिद्दिकी आणि अर्शद अयुब यांना डिफॉल्ट जामीन मंजूर केला होता. मात्र, या निर्णयाला उत्तराखंड सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की, आरोपींनी मुदतवाढ आणि जामीन नाकारण्याच्या आदेशाविरोधात तात्काळ दाद मागितली नाही. उलट त्यांनी दोन महिन्यांचा विलंब केला. त्यामुळे डिफॉल्ट जामीन मागण्याचा अधिकार त्यांनी गमावला असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

## नव्या सरकारच्या स्थापनेचा मार्ग मोकळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी** : विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) निर्णायक विजय मिळवल्यानंतर आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी बुधवारी आपल्या मंत्रिमंडळासह राजीनामा दिला. यामुळे भाजपच्या नेतृत्वाखालील नव्या सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे.

१२६ सदस्यांच्या विधानसभेत एनडीएने तब्बल १०२ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले. या निवडणुका ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात पार पडल्या होत्या, तर ४ मे रोजी मतमोजणी झाली. या निकालामुळे एनडीएचे सत्तेत पुनरागमन निश्चित झाले. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, लक्ष्मण प्रसाद आचार्य यांच्याकडे राजभवनात मुख्यमंत्रीपदासह संपूर्ण मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर करण्यात आला. राज्यपालांनी हा राजीनामा स्वीकारला असून, नव्या सरकारची स्थापना होईपर्यंत सरमा यांनी काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून कार्यरत राहावे, अशी विनंती करण्यात आली आहे. राजीनाम्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सरमा यांनी शपथविधी सोहळा ११ मेनंतर होण्याची शक्यता व्यक्त केली. "हा ऐतिहासिक विजय असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सोहळ्यासाठी निमंत्रित केले आहे. त्यांच्या कार्यक्रमानुसार तारीख निश्चित होईल," असे त्यांनी सांगितले. सरमा म्हणाले की भाजपने दोन केंद्रीय निरीक्षकांची नियुक्ती केली असून त्यांच्या उपस्थितीत विधिमंडळ पक्ष नेत्याची निवड केली जाईल. त्यानंतर एनडीएचे घटक पक्ष एकत्रितपणे अंतिम निर्णय घेतील.

दरम्यान, भाजपने केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली असून हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांची सह-निरीक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. आमदारांची बैठक लवकरच होणार असून त्यात पुढील मुख्यमंत्री निश्चित केला जाणार आहे. या निवडणुकीत भाजपने स्वतंत्रपणे ८२ जागा जिंकल्या, तर मित्रपक्ष बोडोलँड पीपल्स फ्रंट आणि आसाम गण परिषद यांनी प्रत्येकी १० जागा मिळवत आघाडीला बळ दिले. नव्या मंत्रिमंडळात नवीन चेहऱ्यांना संधी मिळणार का, याबाबतचा अंतिम निर्णय नव्या मुख्यमंत्र्यांकडून घेतला जाईल, असे सरमा यांनी स्पष्ट केले.

## कच्च्या तेलाच्या दरात घसरण


**नवी दिल्ली** : अमेरिका आणि इराण यांच्यातील संभाव्य तोडगा निघण्याच्या संकेतांच्या पार्श्वभूमीवर जागतिक निर्देशांकांमध्ये झालेल्या मोठ्या घसरणीमुळे, बुधवारी वायदे बाजारात कच्च्या तेलाच्या किमती ११ टक्क्यांहून अधिक घसरून प्रति बॅरल ८,५८८ रुपयांवर आल्या. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर, १२,१३२ लॉट्सच्या उलाढालीत, मे महिन्याच्या डिलिव्हरीसाठीच्या कच्च्या तेलाच्या दरात ११.४५ टक्क्यांनी घसरण होऊन तो प्रति बॅरल ८,५८८ रुपयांवर पोहोचला.

## तामिळनाडूत काँग्रेसचा मोठा निर्णय

# विजय यांच्या टीव्हीकेला पाठिंबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : तामिळनाडूच्या राजकारणात मोठा भूकंप घडवत काँग्रेसने अभिनेते-राजकारणी विजय यांच्या तमिळगा वेट्री कळघम (टीव्हीके) पक्षाला सरकार स्थापनेसाठी पाठिंबा जाहीर केला आहे. याचवेळी काँग्रेसने द्रविड मुनेत्र कळघम (डीएमके) सोबतची दीर्घकाळची युती तोडत राज्यातील पारंपरिक आघाडीच्या समीकरणांना धक्का दिला आहे.



पनयूर येथील टीव्हीके मुख्यालयात काँग्रेस आमदारांचे शिष्टमंडळ पोहोचले आणि विजय यांच्यासोबत उच्चस्तरीय बैठक पार पडली. या भेटीमुळे राज्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून आगामी सत्तास्थापनेच्या दृष्टीने नव्या आघाडीचे संकेत स्पष्ट झाले आहेत. विजय यांनी काँग्रेस नेत्यांचे पुष्पहार व शाली देऊन स्वागत केले. काँग्रेसचे तामिळनाडू प्रभारी गिरीश चोडणकर यांनी या निर्णयाची घोषणा करताना सांगितले की, तामिळनाडू काँग्रेस समिती आणि काँग्रेस विधिमंडळ पक्षाने टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा ठराव मंजूर केला आहे. मात्र हा पाठिंबा सशर्त असून "संविधानावर विश्वास नसलेल्या जातीयवादी शक्तींना आघाडीत स्थान न देण्याची" अट घालण्यात आली आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत २३४ पैकी १०८ जागा जिंकत टीव्हीके हा सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. द्रविड मुनेत्र कळघम (डीएमके) ला ५९, तर अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम (एआयएडीएमके) ला ४७ जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसच्या पाठिंब्यामुळे टीव्हीकेच्या संख्याबळात पाच आमदारांची भर पडून एकूण ताकद ११२ वर पोहोचली आहे. बहुमतासाठी आवश्यक ११८ च्या आकड्यापर्यंत पोहोचण्यासाठी अजून सहा आमदारांची गरज आहे.

बहुमत मिळवण्यासाठी विजय यांनी विदुथलाई सिरुथैगल काची (व्हीसीके), भारतीय कम्युनिस्ट पक्ष (सीपीआय) आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) (सीपीएम) यांसारख्या पक्षांशी चर्चा सुरू केल्याचे समोर आले आहे. त्यांच्या पाठिंब्यामुळे बहुमताचा मार्ग सुकर होऊ शकतो.

काँग्रेसने स्पष्ट केले की ही भागीदारी केवळ सरकार स्थापनेपुरती मर्यादित नसून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, लोकसभा आणि राज्यसभेच्या निवडणुकांसाठीही कायम राहील. "परस्पर आदर, योग्य वाटा आणि सामायिक जबाबदारी" या तत्त्वांवर ही आघाडी आधारित असेल, असे चोडणकर यांनी सांगितले.

## वादळी पावसाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीय हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, पुढील आठवड्यात देशातील विविध भागांमध्ये हवामानाचे दोन टोकाचे चित्र पाहायला मिळणार आहे. वायव्य भारतात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, पश्चिम राजस्थानमध्ये तीव्र उष्णतेची लाट कायम राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

६ मे रोजी दुपारी जारी केलेल्या अंदाजानुसार, १० ते १२ मे दरम्यान वायव्य भारतात मेघगर्जनेसह पाऊस, विजांचा कडकडाट आणि ताशी ४० ते ६० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यांची शक्यता आहे. या हवामान बदलाचा परिणाम प्रामुख्याने जम्मू आणि काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्ली या भागांमध्ये जाणवण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, दक्षिण भारतात पुढील ६ ते ७ दिवस मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. केरळ, तामिळनाडू, पुदुचेरी आणि कराईकल येथे मेघगर्जनेसह जोरदार पावसाची शक्यता आहे. गेल्या २४ तासांत केरळमधील काही भागांमध्ये ११ ते २० सेंमीपर्यंत पावसाची नोंद झाली आहे. ईशान्य भारतातही पावसाची तीव्रता कायम राहणार असून अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालय येथे सर्वत्र पाऊस आणि काही ठिकाणी मुसळधार सरींचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## भारताची प्रतीक्षा न करता चीनकडे वळण्याची भूमिका

# तीस्ता करारावरून बांगलादेशने दिला इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालमध्ये सत्तांतराच्या पार्श्वभूमीवर भारत-बांगलादेश संबंधांमध्ये महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. बांगलादेशने दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या तीस्ता नदी पाणी वाटप करार संदर्भात आता भारताची प्रतीक्षा करणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. बांगलादेशचे परराष्ट्र मंत्री खलीलुर रहमान यांनी मंगळवारी केलेल्या वक्तव्यात, "आम्ही अनिश्चित काळ भारताची वाट पाहू शकत नाही; त्यामुळे पर्यायी पर्यायांचा विचार करावा लागेल," असे ठामपणे सांगितले. या पार्श्वभूमीवर बांगलादेश चीनकडे वळण्याची तयारी करत असल्याचेही त्यांनी सूचित केले.



बीजिंग दौऱ्यापूर्वी माध्यमांशी बोलताना रहमान यांनी स्पष्ट केले की, चीनसोबतच्या चर्चेत तीस्ता प्रकल्प हा प्रमुख अजेंडा असेल. चीन कडून आर्थिक मदत, कमी व्याजदराचे कर्ज आणि गुंतवणूक मिळवण्याचा बांगलादेशचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी नमूद केले. यामुळे दक्षिण आशियातील भू-राजकीय समीकरणांमध्ये नवे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये भाजप सरकार स्थापन होण्याच्या प्रक्रियेबाबत विचारले असता रहमान यांनी संयत प्रतिक्रिया दिली. "तेथे अजून सरकार स्थापन झालेले नाही. त्यांच्या भूमिकेबाबत अंदाज बांधणे योग्य नाही. मात्र आम्ही आमचे हित पाहून निर्णय घेऊ," असे त्यांनी स्पष्ट केले. या वक्तव्यामुळे, भारत-बांगलादेश संबंधांमध्ये राज्यस्तरीय राजकारणाचा प्रभाव अधोरेखित झाला आहे.

तीस्ता नदीच्या पाणी वाटपावरून भारत आणि बांगलादेश यांच्यात अनेक दशकांपासून मतभेद कायम आहेत. २०११ मध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या बांगलादेश दौऱ्यावेळी कराराचा प्रस्ताव पुढे आला होता. या प्रस्तावानुसार नदीचे सुमारे ३७.५ टक्के पाणी बांगलादेशला आणि ४२.५ टक्के भारताला देण्याचे ठरले होते. मात्र पश्चिम बंगाल सरकारच्या विरोधामुळे हा करार अंतिम रूप घेऊ शकला नाही.

यापूर्वी १९८३ मध्ये दोन्ही देशांमध्ये तात्पुरता करार झाला होता, ज्यामध्ये बांगलादेशला ३६ टक्के आणि भारताला ३९ टक्के पाणी देण्याचे निश्चित झाले होते. उर्वरित २५ टक्क्यांवर नंतर निर्णय घेण्याचे ठरले होते; परंतु या कराराची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही. २०१५ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यादरम्यानही या प्रश्नावर तोडगा निघण्याची अपेक्षा होती, पण ती पूर्ण झाली नाही.

भारत आणि बांगलादेश यांच्यात एकूण ५४ नद्यांचे पाणी वाटपाचा विषय आहे, मात्र केवळ गंगा नदी आणि कुशियारा नदी या दोन नद्यांवरच औपचारिक करार झाले आहेत. इतर नद्यांबाबतचे प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत.

तीस्ता करारातील विलंबामुळे बांगलादेशने २०१९ मध्ये 'तीस्ता नदी सर्वसमावेशक व्यवस्थापन आणि पुनरुज्जीवन प्रकल्प' सुरू केला होता. त्यावेळीही त्यांनी चीनकडून मदतीची मागणी केली होती. आता पुन्हा एकदा वांग यी यांच्यासोबतच्या बैठकीत या प्रकल्पाला गती देण्याचा प्रयत्न होणार आहे.